म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. ८७४

गासलिन

# लोकशाही

REFBK-0019203

९८२०३

लोकशाही

स्थळ प्रत

ग्रं. नं. ९३...

# लोकशाही

( अनुवाद )

ग्रं. क्र. ९९२०३

रॉलिस
ओमर गॉसलिन

REFBK-0019203

मुंबई
नव साहित्य प्रकाशन

किंमत
एक रुपया आठ आणे.

प्रकाशक
विमलचंद्र
नव साहित्य प्रकाशन
पोष्ट बॉक्स नं. ४०३३ ग्रान्ट रोड मुंबई

मुद्रक
धीरूभाई दलाल
असोसिएटेड ॲडव्हर्टायझर्स ॲन्ड प्रिन्टर्स लि.
मुंबई नं ७

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. १८२०३



# दार उघडें आहे

तुमच्या गळाला मासा लागला आणि तुम्हीं त्याला पाण्यांतून बाहेर ओढूं लागलांत, तर काय होईल सांगा ? मासा इकडून तिकडे उसळी घेईल आणि गळाच्या दोरीला कधीं इकडे तर कधीं तिकडे असे सारखे हिसके देत राहील.

पक्ष्यांना पिंजऱ्यांत कोंडून ठेवलें म्हणजे त्यांची फडफड चालू होते, गजांवर आपटून आपटून त्यांचीं पिसें झडतात आणि ज्या क्षणीं दरवाजा उघडा राहतो, त्याच



कोण होणार तुम्हीं ?—वाऱ्यावरले स्वैर पक्षी...

सं. नं. नि: ८७४.



...कीं पिंजऱ्यातला पोपट ?

क्षणीं ते एकदम भुरकन् उडून जातात. कारण पक्षी तर वाऱ्याप्रमाणें स्वतंत्र राहणारे असतात.

फार कशाला ? तुमच्या कुत्र्यालादेखील पट्टयानें जखडून राहिलेलें आवडत नाहीं. तो पट्टा तोडायला धडपडतो आणि पळून जाण्याची संधि बघत असतो. जर तुम्हीं त्याला मागच्या पडवींत बांधलेंत तर तो सारखा भुंकून शेजाऱ्यापाजाऱ्यांना त्रास देईल.

माशांना जसें पाण्याच्या बाहेर यायला आवडत नाहीं किंवा पक्ष्यांना जसें पिंजऱ्यांत कोंडून राहायला आवडत नाहीं, तसेंच माणसांनासुद्धा कुणाच्या बंधनांत राहणें आवडत नाहीं. पुरुष, स्त्रिया, मुलें, मुली यांना स्वतःचें मन असतें; आपल्या भोंवतालीं काय चाललें आहे, हें समजून घेण्याची, व आपल्या आवडीच्या विषयासंबंधीं अधिक माहिती मिळवण्याची इच्छा त्यांना असणें स्वाभाविकच आहे.

आपल्या वेळेचा उपयोग आपण कसा करावा, आपण काय शिकावें किंवा आपल्या उपजीविकेसाठीं कसल्या प्रकारचें काम करावें, याबद्दल त्यांचें स्वतःचें कांहीं तरी मत असणें, स्वाभाविकच आहे. त्यामुळें कोणीं त्यांच्या मनपसंत बेतांत अडथळा आणला आणि दुसरेंच कांहीं काम त्यांना करायला सांगितलें तर ते नाखूष

होतात. असे ते नाखूष न होतील तरच आश्चर्य !

पुष्कळशा लोकांमध्यें कांहीं विशिष्ट प्रकारची योग्यता असते. कुणी यंत्रविशारद, कुणी शास्त्रज्ञ, कुणी गवई, तर कुणी डॉक्टर होईल. पोहणें ज्याप्रमाणें माशाचा गुणधर्म त्याचप्रमाणें चित्र काढणें व रंगविणें हें चित्रकाराचें स्वाभाविक काम; परंतु त्यांच्या कामांत अडथळा करणें अथवा त्याला व्यापारी किंवा वकील व्हायला भाग पाडणें ही किती खेदाची गोष्ट आहे !

शतकांनुशतकें स्त्रीपुरुषांनीं जास्तींत जास्त स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं धडपड केलेली आहे. कुणापासून हें स्वातंत्र्य त्यांनीं मिळवलें ? प्रजेनें काय करावें किंवा कसला विचार करावा यांचीं फर्मानें काढून तिच्यावर आपली सुलतानी गाजविणाऱ्या झोटिंगशहांपासून ! त्या सुलतानांनीं स्वतःसाठीं जमिनी, धन, दौलत जिंकून आणण्यासाठीं आपल्या प्रजेला जन्मभर लढाईंतच गुंतवून ठेवलें. कांहीं निर्दय राजांनीं मोठमोठया इमारती व राजवाडे बांधण्याची आपल्या गुलामांवर सक्ति केली आणि कांहीं राजांनीं तर आपल्या प्रजेला कांहीं खास कायद्यांप्रमाणें किंवा एकाद्या ठराविक धर्माप्रमाणें वागण्यास, नाहींतर डोईजड कर देण्यास भाग पाडलें. वेळ येतांच लोकांनीं त्यांच्या जुलमांचा



बागेत गवत कापणे कांहीं सोपें नसते...



....आतां आपण पोहायला जाऊं.


विरोध केला, बंड केलें. आपला स्वतःचा पुढारी निवडण्याचें, आपले कायदे स्वतःच बनविण्याचें आणि आपला कारभार आपणच चालविण्याचें स्वातंत्र्य असावें या मागणीचा लोकांनीं आग्रह धरला. आपल्या आवडीचीं कामें करण्याचें आपल्याला स्वातंत्र्य असावें हीच आपली सर्वांची इच्छा असते.


विशेषतः आपल्या मनाप्रमाणें विचार करण्याची मोकळीक स्त्रीपुरुषांना हवी असते. अमक्या किंवा तमक्या गोष्टीवर विश्वास ठेवा, असें कोणीं सांगितलेलें त्यांना आवडत नसतें. एकाद्या गोष्टीला मान्यता देण्याचा वा, ती अमान्य करण्याचा, एकादी कल्पना अंगिकारायची किंवा तिच्याऐवजीं दुसरी एकादी पत्करायची, याचा अधिकार आपल्याला असावा असें त्यांना वाटतें. त्याचप्रमाणें एकादी व्यक्ति किंवा एकादी गोष्ट पसंत नसेल तर तसें सांगण्याचें सामर्थ्य आपल्यांत असावें अशीही त्यांची इच्छा असते.

लोकशाही म्हणजे स्वातंत्र्य ! कोणत्याही प्रकारच्या अडथळयाशिवाय आपल्या आवडींचा आणि योग्यतांचा विकास करण्याचें आणि आपल्या प्रवृत्तींना पूर्ण वाव देण्याचें स्वातंत्र्य लोकांना असणें म्हणजेच लोकशाही ! आपल्या जीवनाची जबाबदारी सांभाळण्याची मुभा त्यांना लोकशाहींत असते.


# आतां तुमची पाळी आहे.

स्वातंत्र्य वाटतें तितकें सोपें नसतें. निव्वळ वाऱ्याप्रमाणें स्वैर होऊन भागणार नाहीं. वारा कधीं कधीं नुसता पाला-पाचोळा उडवून लावण्यांतच आपली शक्ति खर्च करीत असतो. जे लोक मन मानेल तसें वागण्यास स्वतंत्र आहेत, त्यांनीं आपण या स्वातंत्र्याचें काय करणार आहोंत याबद्दल आपला निर्णय घेतला





वारा अशीं पानें उडवून लावतो...



...आणि अशी पवनचक्की पण चालवतो.

पाहिजे. जोंपर्यंत आपण काय करावें याविषयीं आपल्याला दुसरी एकादी व्यक्ति सांगत असते, तोपर्यंत आपण आपल्या भविष्याबद्दल निश्चित असतों. परंतु स्वातंत्र्य येतांक्षणींच तुमच्यावरच आपल्या कामाची सर्व जबाबदारी येऊन पडते आणि तुम्हांलाच नवीन योजनांची आंखणी व निवड करावी लागते.

आपली मोटार स्वत: चालवूं पाहणाराला हें माहीत असायलाच हवें, कीं मोटार चालूं कशी होते, तिचा वेग कसा बदलतो किंवा ब्रेक कशासाठीं लावावा लागतो. त्याचप्रमाणें आपण कुठें जात आहों हेंही त्याला कळायला पाहिजे. त्याचा हात सतत स्टीअरींग व्हीलवर पाहिजे.

एकामागून एक सर्व देशांना आतां कळून चुकलें आहे कीं एकाद्या राजाच्या किंवा सम्राटाच्या सत्तेचें जोखड गेलें म्हणजेच कांहीं त्यांचे क्लेश संपत नसतात. आपल्यावर दुसऱ्या कोणाची सत्ता चालूं नये असें तुम्हांला वाटत असेल तर आपणच आपल्यावर सत्ता चालवायला शिकलें पाहिजे, आपल्या प्रश्नांचा निर्णय लावला पाहिजे व अडचणींतून मार्ग काढला पाहिजे.

तुमच्या शहरांतल्या किंवा देशांतल्या रहदारीचे नियम कोण बनवितें याचा तुम्हीं कधीं विचार केला

आहे काय ? शहरांतील रस्तादुरुस्ती, पाणीपुरवठा, आगीचे बंब, शाळा, इस्पितळें, पोलिस, बागा, पूल; त्याचप्रमाणें इतर शेंकडों उपयुक्त गोष्टींची देखरेख कोण करतें हें समजून घेण्याचें तुमच्या मनांत आलें आहे का ? हें करा किंवा तें करूं नका असें सांगणारा इथें कुणी हुकुमशहा नाहीं ! तुमच्या शहरांत राहणारे लोकच तेथें काय घडतें त्याला जबाबदार आहेत. त्यांनींच नियम बनविलेले आहेत व त्यांनींच कांहीं खास स्त्रीपुरुषांना निरनिराळया कामांसाठीं निवडलेलें आहे.

यांतील होणारी एकादी गोष्ट जर कोणाला पसंत नसेल तर निव्वळ दगडफेंक करण्यापेक्षां त्यांनीं कांहींतरी अधिक करायला हवें. चुकतें कुठें हें पाहून कामाच्या नवीन नवीन पद्धति शोधून काढणें व त्या पद्धति योग्य तऱ्हेनें अंमलांत आणल्या जातात किंवा नाहीं, हें त्या शहरांतल्या किंवा राष्ट्रांतल्या नागरिकांनींच पहावयाचें असतें.

•

परंतु पुष्कळदां लोकांना आपलें स्वतःचें काम करायचा कंटाळा येतो. त्यांना वाटतें कीं त्यांच्या अडचणी दुसऱ्या कुणींतरी सोडवून त्यांवर उपाययोजना करावी. आणि मग ज्या क्षणीं ते आपल्या सरकारचें काम दुसऱ्यावर सोंपवून देतात त्याच क्षणीं ते आपल्या



उगीच दगड फेंक करावो कीं...



...अशी स्वर साधना शिकावी !

स्वातंत्र्याला मुकतात.


एकादा खेळ कसा खेळावा हें शिकण्याइतकेंच आपण आपल्यावर राज्य कसें करावें हें शिकणेंही कठीण आहे. ज्या मुलाला फुटबॉल किंवा बेसबॉल खेळायचा आहे त्याला मेहनत केली पाहिजे, दररोज दुपारीं तालमींत गेलें पाहिजे, शरीर सुदृढ राखलें पाहिजे व आपल्या हाता-पायांच्या स्नायूंवर इतका ताबा ठेवला पाहिजे कीं त्याला सहज धांवतां येईल व चेंडू पकडतां येईल. जसजसा तो या गोष्टी आत्मसात करील, तसतसा त्याला तो खेळ चांगल्या प्रकारें खेळतां येईल व तितकाच अधिक आंनदही त्या खेळांत मिळेल.

लोकशाही म्हणजे स्वराज्य, अर्थात् स्वतःचें सरकार. स्त्रिया, पुरुष, मुलें, मुली यांना स्वातंत्र्याचा आनंद उपभोगायचा असेल, तर त्यांनीं आपलें राज्य आपण चालविण्याचे प्रयत्न करण्यास आणि कष्ट सोसण्यास तयार असलें पाहिजे.

क्र. १८२०३


# सगळे आपण सारखेच

वादनकार तयारी करीत आहेत. प्रत्येक वादनकारासमोर त्याच्या पाठाचें सारेगम लिहिलेलें आहे. व्हायोलिन, छोटया छोटया बांसऱ्या, सेक्सो-फ़ोन, तुताऱ्या, सनई, सतार, सारंगी आणि मोठमोठे ढोल इत्यादि सर्व प्रकारचीं वाद्यें तेथें आहेत. जेव्हां त्यांचा नायक छडी वर उचलील, तेव्हां ते वाद्यें वाजवायला सुरुवात करतील. त्यांतून जो आवाज निर्माण होईल, त्याचें एकसमुच्चयानें सुंदर संगीत





दोरीच्या आधारावर…



...कीं एकामेकाच्या आधारावर ?

बनेल. पण समजा कीं बांसरीवाला जर असें म्हणाला, "मी वाजवीन नाहींतर नाहीं वाजवणार, त्यानें फरक थोडाच पडणार आहे ? बांसरीची कांहीं खास आवश्यकता नाहीं. सगळे वाजवीत आहेतच; त्यांत माझा एकट्याचा आवाज कुणाला ऐकूं जाणार आहे ? मी वाजवणं बंद केलं म्हणून काय बिघडणार आहे ?" याचप्रमाणें व्हायोलिनवाला, सतारवाला किंवा सनईवालाही असेंच म्हणाला तर ? एक एकजण जर आपलें वादन बंद करीत जाईल तर थोड्याच वेळांत वृंदवादनांतून सुंदर संगीत ऐकूं येण्याऐवजीं निरनिराळे बेसूर आवाज बाहेर पडतील.

एका सुंदर संगीताची निर्मिति करण्यासाठीं प्रत्येक आयुधाची आवश्यकता असते. बांसरीचे कोमल स्वर सारंगीच्या मंद आणि गंभीर स्वरांना एक प्रकारची लय आणतात. वादनकारांच्या मेळाव्यापैकीं एकादा जरी गप्प झाला तरी संगीतांत कांहीं तरी कमतरता जाणवूं लागते.


फुटबॉलचा सामना जिंकायचा असेल तर खेळाडूंच्या संघामधल्या प्रत्येक खेळाडूला आपापलें काम नीट केलें पाहिजे. फुटबॉल घेऊन जाणारा खेळाडू कितीही जोरांत पळत असला तरी त्याचे साथीदार जेव्हां त्याला रस्ता

मोकळा करून देतील तेव्हांच तो गोलापर्यंत पोचूं शकेल.

एका टीमचे खेळाडू या नात्यानें आपल्यापैकीं प्रत्येकानें त्याच्यावर सोंपविलेलें काम पुरें करावें, त्याचप्रमाणें टीममधील इतर व्यक्तींनींही आपापलें काम नीट पार पाडावें अशी सर्वांची अपेक्षा असते. हीच गोष्ट घराची आणि शाळेची. आपण दुसऱ्यावर विश्वास ठेवतों व दुसरे आपल्यावर विश्वास ठेवतात. जोंपर्यंत आपण आणि इतर लोक आपापलीं कामें नीट करीत असतात तोंपर्यंत हें सुरळीत चालूंही राहतें.

आपण जर दोरीवर नाचणाऱ्या कळसूत्री बाहुल्या असतों तर आपल्याला टीमप्रमाणें खेळण्याची किंवा कुठल्याही कामाची जबाबदारी घेण्याचा प्रश्नच निर्माण झाला नसता. दोरीच्या दुसऱ्या टोकाला बसलेल्या व्यक्तीनें आपल्याला नाचविलें असतें आणि आपली काळजी वाळगली असती.

परंतु आपल्यापैकीं कुणालाही असें वाटणार नाहीं कीं आपण कळसूत्री बाहुल्या व्हावें आणि दुसऱ्याच्या हातून आपल्या हालचाली व्हाव्यात. आपले हातपाय हलवून केव्हांही आणि कुठेंही आपल्या मनाप्रमाणें हिंडण्याफिरण्याचा आनंद बाहुल्यांना मिळूं शकत नाहीं फुटबॉलच्या खेळाची मजा त्यांना चाखतां येणार नाहीं आणि तो खेळतांना होणाऱ्या रेटारेटींत भाग घेऊन



संघटित आणि आज्ञांकित संचालन-



...संघनायकाच्या सूचनेवरहुकूम खेळ!

खेळाचा निर्णय लावण्यांतही मदत करतां येणार नाहीं.

कधीं कधीं अर्थातच आपण निर्णय घेण्यासाठीं आपल्यापैकींच एकाद्याला निवडतों. आपला म्होरक्या पुढच्या खेळासंबंधीं आपल्याला सूचना देईल असा टीम-मधल्या लोकांना विश्वास असतो. शहरांतले लोक नगराध्यक्ष आणि राष्ट्रांतले लोक राष्ट्रपति निवडतात; पण ही निवडणूक झाली म्हणजे आपापलें काम संपलें असें नव्हे.


या निवडणुकीनंतर आपण नेत्यांशीं सहमत असलों किंवा नसलों तरी त्यांनीं केलेले नियम आपण पाळले पाहिजेत व दिलेला न्याय आपण मानला पाहिजे. जोंपर्यंत दुसरा कोणी निवडून येत नाहीं किंवा नियमांत बदल होत नाहीं तोंपर्यंत ही रहाटी चालू राहिली पाहिजे.


"निवडणुकींत माझी जरूर नाहीं" असें म्हणणारा माणूस आपल्या शहरांत किंवा देशांत होणाऱ्या घटनांमध्यें भाग घेण्याची संधि गमावीत असतो. त्याला कोणत्या प्रकारचें सरकार पाहिजे याचा निर्णय घेण्याचें काम तो दुसऱ्यावर सोंपवतो.

लोकशाही म्हणजे जबाबदारी स्वीकारणें. खेळ खेळणाऱ्या खेळाडूप्रमाणें लोकशाहींतील नागरिक परस्परांवर विश्वास ठेवून सरकारचें कार्य सफल करतात.


# माझा मार्ग कोणता ?

जोशी कुटुंबांतल्या लोकांचा उन्हाळ्याच्या सुट्टींत बाहेर जाण्याचा बेत आहे; पण कुठें जावें हें त्यांचें अजून नक्की ठरलें नाहीं. बारा वर्षांचा मधू आग्रह करतो कीं लोणावळ्याला घर घ्यावें.





तेथें गेल्या वर्षी बालवीरांच्या छावणीसाठीं तो गेला होता. त्याची बहीण विद्या समुद्र किनाऱ्यावर जाऊं म्हणते. कारण तिथें तिला वाळूंत लोळतां येईल आपला नवा पोहण्याचा पोशाख घालून मिरवतां येईल आणि सकाळच्या उन्हाचं



एक'मार्गी वाहतूक...



...जाण्यासाठीं रस्तेच रस्ते.

मजा लुटतां येईल. बाबांना शांतपणें वाचन करायचें आहे म्हणून ते विद्याचा पक्ष घेतील. परंतु कॉलेज कुमार दिनेश म्हणतो कीं मोटरनें महाबळेश्वरहून उटकमंडपर्यंत जाण्यांतच खरी मौज आहे.

आईचा मात्र कांहींच निश्चय होत नाहीं. तिला स्वयंपाकपाणी, धुणींभांडीं, अंथरुणें पांघरुणें यांच्यांतून कांहीं दिवस सुटका पाहिजे आहे, म्हणून तिला लोणावळ्याच्या घरापेक्षां समुद्र किनाऱ्यावरचें एकादें हॉटेलच रहाण्याच्या दृष्टीनें पसंत पडतें.

दिवसांमागून दिवस गेले. पण सगळ्या कुटुंबाचा एक निर्णय होऊं शकला नाहीं. आतां ते काय बरं करतील ? अर्थात् बाबा पुढें जातील आणि लोणावळ्याचें घर घेऊन सांगतील कीं सर्व मंडळींनीं तिथेंच राहावें. अशा वेळीं दिनेश, मधू किंवा आई यांना तें पसंत नसलें तरी जाणें भागच पडेल.पण बाबा असें करणार नाहींत.ते या गोष्टीचा निर्णय करण्यासाठीं सर्वांची एक सभा बोलावतील.

विद्या बाबांना पटवून देते कीं लोणावळ्याप्रमाणेंच समुद्रकिनारींदेखील त्यांना शांतपणें वाचन करतां येईल. पण मधूचा आग्रह अजून लोणावळ्याबद्दलच आहे, तर दिनेश मोटरच्या सफरीचें तुणतुणें वाजवीत बसला आहे. सरते शेवटीं मतें घेतलीं जातात आणि

तिनास दोन मतें पडून समुद्रकिनारावाल्यांचा विजय होतो. विद्या दिनेश यांना आपलें म्हणणें सोडून द्यावें लागतें. पण आई बाबा आणि मधू त्यांच्या म्हणण्याचा पुढच्या वर्षी विचार करण्याचें वचन देतात.

सुट्टीची गोष्ट जाऊं दे पण इतरही पुष्कळशा गोष्टींवरून लोकांत मतभेद होतात. ते जर हवामानाची चर्चा करीत असले, तर एकाला थंडी हवी असते तर दुसऱ्याला उन्हाळा. एक म्हणतो उद्यां लख्ख ऊन पडेल तर दुसरा म्हणतो, नक्की पाऊस येईल ! किंवा तुमचा एकादा मित्र म्हणेल कीं एकादी सिनेमानटी उत्कृष्ट काम करते, तर तुम्हांला ती मुळींच आवडत नसेल. जेव्हां तुम्हांला संघनायक निवडावयाचा असतो तेव्हां कांहीं खेळाडू एकाचा पक्ष घेतात, तर कांहींना दुसराच संघनायक पाहिजे असतो.

प्रश्नाचें महत्त्व जितकें अधिक, तितके लोक जास्त उत्तेजित होतात. ज्यावेळीं अध्यक्षाची निवडणूक होते त्या वेळीं मिरवणुका निघतात, सभा होतात, भाषणें होतात. एका पक्षाचे लोक म्हणतात कीं देशाचा प्रश्न आम्हांलाच चांगल्या प्रकारें सोडवता येतो, म्हणून आमचाच उमेदवार सर्वांनीं निवडावा.

सर्वांना वाटत असतें कीं आमच्याच उमेदवाराला



आम्ही ऐकून घेतो...




...कांहीं अनुकूल, कांहीं प्रतिकूल !

सर्वांनीं मतें द्यावीं. निवडणुकीचा दिवस येण्यापूर्वी लोकांना तऱ्हेतऱ्हेचे युक्तिवाद ऐकायला मिळतात आणि ते कोणत्या उमेदवाराला मत द्यायचें तें ठरवतात. ज्याला सर्वांत जास्त मतें मिळतात तो निवडून येतो.

पण समजा, स्त्रीपुरुषांना निवडणुकीची संधीच मिळाली नाहीं किंवा देशाचा कारभार एकाच राजकीय पक्षाकडे नेहमीं राहिला, किंवा निवडणुकीला एकच उमेदवार उभा असला; आणि लोकांना आवडो किंवा न आवडो त्यालाच मत देऊन निवडून देणें भाग पडलें तर? तर त्यांना लौकरच असें वाटायला लागेल कीं आपला आपण कारभार चालवण्याचा अधिकारही आपल्याला मिळालेला नाहीं किंवा आपल्याला स्वातंत्र्यही मिळालेलें नाहीं.

लोकशाही म्हणजे भिन्न मतप्रवाह! याचाच अर्थ आंधळेपणानें पुढाऱ्याच्या मागून न जातां आपला पक्ष निवडून विजय मिळवणें. लोकशाही म्हणजेच वादविवाद करणें, युक्तिवाद मांडणें, दुसऱ्याचें सांगणें बिनतक्रार न मानणें होय. लोकशाही म्हणजे एकच गोष्ट करायची किंवा एकाच मार्गानें जायचें असा आग्रह धरणें नव्हे, तर स्त्रिया, पुरुष, मुलें, मुली, या सर्वांनीं मिळून खेळाचा पुढचा डाव कसा रचायचा, मार्ग कोणता पत्करायचा किंवा अध्यक्ष कोणता निवडायचा याचा एकत्र निर्णय घेणें, होय.



# खेळकर पणा

भुकेलेल्या डुकरांचा कळप एकमेकांना ढकलीत ढकलीत गव्हाणीवर कसा झडप घालतो हें तुम्हीं कधीं पाहिले आहे काय ? यावरून प्रत्येकजण आपल्या स्वत:साठीं कशी धडपड करीत असतो तें दिसतें. जे मोठे असतात ते आधीं पुढें जातात आणि लहानांबद्दल विचार करायला त्यांना सवडच होत नाहीं. लहानांना पोटभर खायला मिळत नाहीं. म्हणूनच डुकरांना आपण आप्पलपोटे म्हणतों. आप्पलपोटे लोक सर्वांना खेळण्याची संधि देत नाहींत. खेळांतून कोणी बाहेर राहिला तरी त्यांना त्याची पर्वा



दुसऱ्याचा कोण विचार करतो ?...



वैरी देखील दोस्त बनतात,

नसते. त्यांना वाटतें कीं अमक्या एका संघाला खेळांत घेऊं नये, कारण त्यांना आपल्यासारखें चांगलें खेळतां येत नाहीं किंवा त्यांच्याजवळ गणवेश नाहीं किंवा ते शहराच्या दुसऱ्या भागांत राहतात.

एकादा वाईट खेळाडू हरतो, तेव्हां तो पंचांबरोबर वाद घालूं लागतो किंवा आपल्याला खेळायला नीट संधीच मिळाली नाहीं वगैरे सबबी सांगतो. त्यानें जर जिंकलें तर दुसऱ्याचा खेळ चांगला झाला हें म्हणायला तो तयार नसतो. त्याचप्रमाणें परत खेळ खेळायचीही त्याची तयारी नसते.

आपल्याला सर्वांनाच विजय आवडतो. खेळायच्या आनंदाचाच हा एक भाग आहे. खो खो, आटचापाटचा, क्रिकेट, टेनिस किंवा पिंगपाँग–खेळ कोणताही असो, आपण शक्य तितका उच्च क्रमांक गांठावा असें प्रत्येकाला वाटतें. पण आपण सगळेचजण, सगळ्याच वेळीं कसे जिंकणार ? आपण कितीही चांगले खेळाडू असलों किंवा आपलें नशीब कितीही बलवत्तर असलें तरी कांहीं वेळा अशाही येतात कीं दुसरा कोणी आपल्यापुढें जाऊन, आपल्यापेक्षां जास्त क्रमांक मिळवून विजयी होतो. म्हणूनच जय होवो किंवा पराजय, आपण सर्वांनीं खिलाडू वृत्ति अंगीं बाणवायला शिकलें पाहिजे.

वादविवादापेक्षां खेळामध्यें खिलाडू वृत्तीनें वागणें जास्त सोपें आहे. जेव्हां तुमच्या कुटुंबांतील लोकांचा किंवा तुमच्या मित्रांचा तुमच्याशीं मतभेद होतो तेव्हां तुम्ही डोक्यांत राख घालतां का ? पुष्कळसे घालतातही. त्यांची अशी खात्री असते कीं फक्त त्यांचेंच बरोबर व इतर सर्वांचें चूक. त्यामुळें दुसरा पक्ष काय म्हणतो हें ऐकायला त्यांना आवडत नाहीं. इतकेंच काय, तें ऐकायची त्यांची तयारीच नसते. म्हणूनच त्यांना सदासर्वदा वाईट खेळाडू म्हटलें जातें.

वादविवाद हा देखील एक उत्तम प्रकारचा खेळ आहे. कुठल्याही गोष्टीला नेहमीं दोन किंवा अधिक बाजू असतात. वादामध्यें कोण जिंकलें हें सांगणें सोपें नाहीं. जो खूप वेळ आणि मोठमोठ्यानें ओरडत बोलतो तो जिंकला असें म्हणतां येणार नाहीं खास ! जी व्यक्ति जास्तींत जास्त लोकांना आपलें मत पटवून देईल तीच खरी विजयी म्हटली पाहिजे. पण एवढ्यानेंच वाद संपत नाहीं, तर जिंकणाऱ्यानें खिलाडू वृत्तीनें उलटपक्षाच्या माणसाला बोलण्याची संधि दिली पाहिजे आणि आपण चुकत आहोंत हें त्याचें म्हणणें त्याला मांडू दिलें पाहिजे.

पुष्कळदा असेंही झालें आहे कीं लोक ज्याची टर उडवीत होते तोच शेवटीं बरोबर ठरला. कोलंबसानें



आमचे आम्हींच...



...सगळें कांहीं शिकूं!


जेव्हां सांगितलें, कीं मी जहाजांतून पृथ्वीप्रदक्षिणा करीन तेव्हां फारच थोडया लोकांनीं त्याच्यावर विश्वास ठेवला. त्याच्या बहुतेक मित्रांना असेंच वाटत होतें कीं पृथ्वी सपाट आहे आणि केव्हांना केव्हां तरी कोलंबस आणि त्याचें जहाज किनाऱ्यावरून खालीं कोसळणार. जेव्हां पहिली मोटार तयार झाली तेव्हां ती नसती कटकट समजून लोकांनीं तिची थट्टा केली. जेव्हां विमानाच्या उड्डाणाबद्दल चर्चा सुरू झाली तेव्हां चर्चा करणारांना लोक मूर्ख समजूं लागले.

कुठल्याही वादांत सर्व दृष्टिकोणाचा विचार करणेंच चांगलें. एकादी गोष्ट आज आपल्याला विचित्र वाटली तरी कांहीं दिवसांनीं तीच योग्य वाटूं लागते. नवीन नवीन कल्पनांचें रूपांतर मोठमोठ्या उत्कृष्ट शोधांत होण्याची संधि द्यायची असेल, तर त्या संशोधकांशीं आपला आधीं मतभेद असला तरी त्यांचें म्हणणें नीट खेळकरपणानें ऐकून घेतलें पाहिजे.

लोकशाही म्हणजे सोशिकपणा. प्रत्येक टीमला खेळण्याची आणि वादाच्या वेळीं प्रत्येक पक्षाला आपलें मत मांडण्याची संधि देण्याची इच्छा म्हणजेच लोक-शाही होय ! लोकशाहीमध्यें कोणत्याही पक्षानें स्वतःला दुसऱ्यापेक्षां श्रेष्ठ समजतां कामा नये.


# हिरवा कंदील

गणितांतला एकादा कठीण प्रश्न सोडवतांना, बस पकडायला धावतांना किंवा रात्रीं जेवणासाठीं घरीं परतयेतांना आपण सर्व मोठा रस्ता सोडून पायवाटच पसंत करतों. बागेच्या चौफेर बांधलेल्या सडकेवरून




जाण्यापेक्षां बागेच्या मधून घुसून जाणेंच सोपें वाटतें. पण पायवाटेचें जितकें सुख तितकाच त्यापासून त्रासही होतो. कारण बागेंतून मधूनच घुसल्यामुळें गवत तुडवलें जातें आणि जो परत त्याची मशागत करतो त्याला फार कष्ट पडतात.

सकाळचे सव्वानऊ वाजले आहेत. तुम्हांला



शिरकावाचा एक मार्ग



किल्लीची वाट बघावी कां ?

आधींच उशीर झाल्यामुळें शाळेंत पोंचायची घाई आहे. तुमच्या बुटाचे बंद सैल होऊन त्यांना गांठ बसली आहे. गांठ सोडवण्याऐवजीं तुम्ही एक हिसका देतां. त्याचा परिणाम म्हणजे गांठ सुटण्याऐवजीं बंदच तुटतो आणि तुमची आणखीच अडचण होते.

बुटाचे बंद नीटपणें बांधायला व सोडायला ज्या प्रमाणें धीमेपणा हवा, त्याचप्रमाणें कसरत शिकण्यांतही धीमेपणा पाहिजे. याच काय, दुसऱ्या कोणत्याही कामांत असाच धीमेपणा बाळगला पाहिजे.

तुमच्या बाबांना जर मोटारींतून बाजाराच्या रस्त्यानें जायचें असेल तर त्यांनींही धीमेपणा ठेवला पाहिजे. ते जर खूप वेगानें मोटार चालवतील किंवा लाल दिवा बघूनही पुढें निसटूं बघतील तर ते पकडले जातील. यानंतर पोलीसठाण्यावर जाण्यायेण्यामध्यें आणि न्यायधीशापुढें हजर होण्यामध्यें त्यांचा पुष्कळ वेळ फुकट जाईल. शिवाय दंड भरावा लागेल तो वेगळाच.

पण तुमच्या बाबांना मोटार धीमेपणानें चालवायला कशासाठीं सांगितलें ? त्यांना जर तितकीच जरूर असेल तर ताशीं साठ मैल चालवायची परवानगी त्यांना कां मिळूं नये ? ते एका स्वतंत्र देशांतच राहतात ना ?

अर्थात् ते एका स्वतंत्र देशाचेच रहिवासी आहेत.

पण समजा, प्रत्येकानें ताशीं साठ मैल वेगानें मोटार चालवण्याचें व लाल दिव्याकडे लक्ष न देण्याचें ठरवलें तर काय होईल ? केवळ पुष्कळसे अपघातच होतील असें नाहीं, तर रस्ता अशा तऱ्हेनें चौफेर अडवला जाईल कीं सगळी रहदारी एकदम बंद पडेल. रहदारीचे नियम लोकांनीं वेगानें वाहनें चालवूं नयेत यासाठींच नसतात, तर रहदारी सुरळीत चालावी म्हणूनही असतात.

पुष्कळदा दुसऱ्यांच्या सुखसोयींसाठीं स्वतःच्या स्वातंत्र्याला थोडासा आळा घालावा लागतो. जर आपण सर्वच रॉबिनसन क्रूसोप्रमाणें बनून आपापल्या एकाकी वाळवंटांत जाऊन राहूं लागलों, तर आपण मन मानेल तसें वागूं शकूं. पण वस्तु स्थिति अशी नाहीं. आपण कुटुंबांत राहतों, कुटुंबाचा आपण एक घटक आहोंत आणि आपल्या कुटुंबांना शहरांतल्या किंवा देशांतल्या इतर कुटुंबांशीं मिळून मिसळून रहावें लागतें. आपलीं गांवें, शहरें किंवा प्रांत एका राज्यांत आहेत आणि अशीं राज्यें एका मोठ्या देशाचे घटक आहेत. म्हणूनच आपल्या स्वतःप्रमाणेंच दुसऱ्याच्या इच्छेचाही विचार आपण केला पाहिजे.

सिनेमा सुटल्यानंतर जी गर्दी उसळते तिच्यांत



साऱ्यानांच धोका...

१२२०३.



...सगळे मिळून थांबू या.

घुसा किंवा फुटबॉलची मॅच पाहायला जाणाऱ्या गर्दींत शिरा, तिथें काय होईल ? तुम्हांला कितीही घाई असली तरी गर्दीच्या बरोबरच तुम्हांला चालावें लागेल.

समजा, आपल्यापैकीं कांहींना वाटलें कीं गर्दीची दिशा बदलावी, तर काय करावें लागेल ? दगडफेक करून किंवा लाठीमारानें गर्दी दुसऱ्या दिशेला वळवतां येईल. दिशा बदलण्याचा हा एक उपाय असला, तरी तो आहे मात्र भयंकर. कारण त्यांत लोक उलटून आपल्यावरच दगडफेक किंवा लाठीमार करूं लागण्याची शक्यता आहे. यापेक्षा उत्तम उपाय म्हणजे गर्दींतल्या लोकांना योग्य दिशा दाखवून त्या दिशेला जाण्यासाठीं त्यांचें मन वळवणें होय.

लोकशाहीचा अर्थ धीमेपणा ! याचा अर्थ शांततेच्या मार्गानें काम करण्याचा दृढनिश्चय ! नियमांमध्यें बदल करण्याचा एकादा मार्ग शोधून काढीपर्यंत नियमांचें पूर्ण पालन केलें पाहिजे. आणि असे शांततापूर्ण उपाय शोधून काढीपर्यंत कळ सोसण्याची प्रत्येकाची तयारी पाहिजे.

# सर्वांचें स्थान सारखेंच !

बँड वाजत आहे. झेंडे फडकत आहेत. एका मोठ्या तंबूमध्यें सर्कस सुरू होत आहे. अंगांत लाल रंगाचा सूट, पायांत चमकदार बूट आणि डोक्यावर रेशमी हॅट असलेला एक मनुष्य प्रवेशद्वाराच्या बाहेर उभा राहिला आहे आणि जवळून जाणाऱ्या गर्दीतील लोकांना घसा फोडून सांगत आहे, "एकटे या किंवा सर्व मिळून या. जगांतील सर्वांत उत्कृष्ट खेळ पहा. प्रत्येक क्षणाक्षणाला बदलतें आश्चर्य. आंत जागा खूप आहे. सरळ इकडे या आणि आपलीं तिकिटें विकत घ्या."



आपल्याला सर्वांनाच सर्कस पाहायला आवडते. त्या मोठ्या तंबूमध्यें बसण्यांतही एक प्रकारची गंमत



वाढीला संधीच नाहीं....



...संधि मिळाली, विकास झाला.

आहे. हत्ती, विदूषक, खोगिराशिवाय घोड्यावर बसणारे घोडेस्वार, सिंहाला खेळवणारे वीर, इत्यादि गोष्टी बघण्यांत गंमतच आहे, नाहीं का ? शिवाय वरच्यावर अधांतरीं या दोरीवरून त्या दोरीवर सहज उड्या घेण्याचा आणि लोंबकळण्याचा खेळ पाहण्यांत-सुद्धा किती मौज असते ! प्रत्येक मुलाला केव्हांना केव्हांतरी सर्कस पाहण्याची संधि मिळालीच असेल. तो आपल्या आईवडलांच्या बरोबर गेला असेल किंवा त्याला फुकट तिकीट मिळालें असेल !

निमंत्रणकार्डें किंवा कांहीं विशिष्ट प्रकारचीं तिकिटें ज्यांच्याजवळ आहेत अशा थोड्याशा लोकां-साठीं एकादा छोटासा खेळ करणारी सर्कस आपल्याला आवडत नाहीं. सर्कस जेव्हां शहरांत येते तेव्हां आपल्याला आनंद होतो तो एवढ्याचमुळें कीं ती एका मोठ्या तंबूंत असते आणि तिथें सर्वांना बसायला जागा असते.

सर्वांना सारखी संधि मिळण्याच्या ठिकाणांपैकीं सर्कस एक आहे. कुठें शर्यत सुरू होणार असेल, तर आपल्याला वाटतें कीं ती सुरू करणारानें भेदभाव करूं नये. शर्यत खेळणाऱ्या सर्वांना एकाच रेषेंत उभें करावें आणि ते सर्वजण शिट्टी वाजण्याची वाट पहात थांबतील अशी खात्री करून घ्यावी. कोणी जोरांत धाव-

तील, कोणी मागें पडतील; पण एक गोष्ट स्पष्ट राहील कीं शर्यत सुरू करतांना सर्वजण एकाच रेषेंत होतें.

ज्यांनीं जीवनाच्या क्षेत्रांत नुकतेंच पाऊल टाकलें आहे, अशा मुलांमुलींमध्यें पक्षपात करणें योग्य नाहीं. आतां कुठें त्यांच्या आयुष्याला सुरुवात झालेली असते. त्यांच्यापैकीं कोणी डॉक्टर, कोणी वकील, कोणी वैमानिक किंवा कोणी एंजिनियर होईल. कुणाचें शेतीभाती करण्यांत जास्त मन रमेल. याखेरीज कोणी असेही निघतील कीं ज्यांना मोठमोठ्या इमारती बांधणें, यंत्रें चालविणें याचीच आवड असेल. त्याच प्रमाणें त्यांच्यांत कला, संगीत किंवा अभिनयाची देणगी असलेलेही कोणी निघतील.

मनुष्याला संधि मिळाली तर तो सर्व प्रकारच्या महत्त्वाच्या विषयांवर विचार करूं शकतो, मोटारी विमानें, आगगाड्या यांसंबंधीं विचार, फाऊंटनपेन, जीप बनवण्यासंबंधींचे नवे विचार, रोगप्रतिबंधक औषधें व आरोग्यासाठीं नवीन उपाय, पुस्तकें, चित्रें, किंवा घरें यांसंबंधीं नवीन कल्पना, नवीन खेळ व गाणीं यांविषयीं नव्या कल्पना, त्याचप्रमाणें आपण ज्या जगांत राहतों किंवा रात्रीं जे तारे बघतों त्यासंबंधीं आणि देवासंबंधीं विचार सुचूं शकतात.

एका देशांत, जिथें आपण लोकशाही आहे असें म्हणतों, तिथें शाळा, वाचनालयें, विज्ञानाच्या प्रयोग-



डोळे झांकल्यास चूक ...।



उघड्या डोळ्यांनी अचूक

शाळा, बोलपटगृहें, कलाभुवनें, नाट्यगृहें व संगीतभुवनांची जरूर असते. तिथें सर्वांना प्रवेश असायला हवा. कारण लोकशाही म्हणजे समानसंधि.

अशा तऱ्हेनें लोकशाही म्हटली कीं कितीतरी गोष्टी आल्याच. लोकशाहींतील लोकांनीं आपलें जीवन स्वतंत्रपणें आनंदांत घालवण्याचें शिक्षण घेतलें पाहिजे. आपले महत्त्वाचे प्रश्न कसे सोडवायचे व सर्वांच्या सोयीसाठीं नियम बनवण्याच्या कामांत एकमेकांना कशी मदत करायची याचें शिक्षण त्यांनीं घेतलें पाहिजे. एकाद्या प्रश्नावर मतभेद झाला तर, सर्वांचे युक्तिवाद ऐकून घेऊन, योग्य वाटेल तसेंच वागलें पाहिजे. आपलें मत स्पष्टपणें सांगूं दिलें पाहिजे.

व्यक्तीला काय, समाजाला काय किंवा राष्ट्राला काय, लोकशाही ही सोपी गोष्ट नाहीं. त्यासाठीं शिक्षण व खूप गोष्टींची संवय करायला हवी. चुका होणें स्वाभाविकच आहे. चुकीच्या मार्गानेंही जाण्याचा संभव आहे. योजना सफल होण्यापूर्वीं वारंवार त्यांचा प्रयोग करावा लागतो. परंतु या चुकांची दुरुस्ती करतां येईल, पण केव्हां. कीं जेव्हां आपण मनापासून आपली जबाबदारी पत्करून असा दृढनिश्चय करूं कीं स्वातंत्र्य, सोशिकपणा व समानसंधि सर्वांना हमखास मिळायलाच हवी.



१९२०३

REFBK-0019203